www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 श्री.संतोष शिवदास आमले | 9594509661 श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 278 | वा रविवार दि. 22 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धरणगावात अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

धरणगाव येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करत आता ५० खाटांचे अत्याधुनिक उपजिल्हा रुग्णालय उभारले जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या मुख्य इमारतीच्या आणि डॉक्टर्स निवासस्थानाच्या बांधकामाचे भूमिपूजन आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. यामुळे धरणगाव आणि परिसरातील नागरिकांना अद्ययावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत, ज्यामुळे आरोग्य सेवेत मोठी सुधारणा अपेक्षित आहे. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, राज्याचे मंत्री गिरीश महाजन, स्थानिक आमदार राजूमामा भोळे, खासदार स्मिताताई वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा शल्य चिकित्सक किरण पाटील यांच्यासह अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात, आरोग्य सुविधांचे बळकटीकरण हे शासनाचे प्राधान्य असून, धरणगाव येथे उभारले जाणारे हे रुग्णालय परिसरातील लोकांसाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.



## दृष्य सत्य

**जनतेच्या नजरेतून**
**शासनाच्या दरबारात**

**मंठा तालुक्यातील पंचायत समिती मंठा.**




दैनिक युवक आधार
प्रतिनिधी राजू शिंदे

**पंचायत समिती कार्यालयातील ऑफिस उघडण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या महिला**

# जिल्हा परिषद सेमी इंग्लिश उच्च प्राथमिक केंद्र शाळा धानोरा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



राळेगाव:- पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या जिल्हा परिषद सेमी इंग्लिश उच्च प्राथमिक केंद्र शाळा धानोरा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला, यावेळी उच्च श्रेणी मुख्याध्यापक विजय लांबट, सहाय्यक शिक्षक अविनाश ठाकरे,संदिप टुले, रत्नमाला धुर्वे, रिना चौधरी,प्रनाली रडके, शिक्षण सेवक योगेश घोडे,हे उपस्थित होते. मुख्याध्यापक विजय लांबट व विषय शिक्षीका रत्नमाला धुर्वे यांनी विद्यार्थ्यांना योग आणि प्राणायम या विषयी माहिती दिली. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आपल्या दैनंदीन जीवनात योगा आणि प्राणायम करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांनी विविध योगासने आणि प्राणायम यांची प्रात्याक्षिके केली.

# राष्ट्रीय विमुक्त घुमंतू जनजाती महासभा जिल्हाध्यक्षपदी वीरेंद्र चव्हाण यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



राष्ट्रीय विमुक्त घुमंतू जनजाती महासभा संघटनेत एक महत्त्वाचा बदल घडला आहे,ज्यामध्ये श्री वीरेंद्र भाऊरावजी चव्हाण यांची यवतमाळ जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचा जल्लोष महासभेच्या सदस्यांमध्ये दिसून आला. युवा मोर्चा विदर्भ, महाराष्ट्रचे महामंत्री श्री.मुरली रामप्रकाश राठोड यांनी निवड प्रमाणपत्र देऊन वीरेंद्र चव्हाण यांची जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड केली. श्री चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महासभेचे कार्य अधिक दृढ आणि प्रभावी होईल,असा विश्वास सर्व सदस्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या कामकाजातील उत्साह आणि समाजातील विविध समस्यांवर त्यांचे नेत्रत्व असलेले कार्य, महासभेच्या उद्दिष्टांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

चव्हाण यांची निवड म्हणजे एक नवीन पर्वाची सुरूवात आहे, ज्या अंतर्गत विमुक्त घुमंतू जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक प्रभावी आणि सकारात्मक दिशा मिळेल. त्यांच्या नेतृत्वाखाली महासभेच्या कार्यक्षेत्रात नवे अध्याय लिहले जातील,अशी आशा व्यक्त होत आहे.



**दैनिक युवक आधार** - आयु. राहुल गायकवाड (आसुडगाव) यांचे चिरंजीव *कु. तनिष* याने ARCHITECT INTERIOR DESIGN ही FINAL परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल अभिनंदन करताना ब्लु पॅन्थर्स टीम

# डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून इंडसइंड बँकेचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

IndusInd Bank

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाकडून २०२३-२४चा डिजिटल पेमेंट्स पुरस्कार मिळाल्याची घोषणा इंडसइंड बँकेने केली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात डिजिटल पेमेंटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये या बँकेने तिसरा क्रमांक पटकावला. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्याला केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण प्रमुख पाहुण्या म्हणून आणि अर्थ राज्यमंत्री श्री. पंकज चौधरी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. डिजिटल क्षमता वाढवण्याच्या आणि देशभरातील लाखो लोकांना सक्षम बनवणाऱ्या सुरक्षित, स्केलेबल तसेच नावीन्यपूर्ण डिजिटल पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करण्याच्या इंडसइंड बँकेच्या अढळ वचनबद्धतेचा हा पुरस्कार म्हणजे एक पुरावा आहे. वित्तीय सेवा विभागाने जारी केलेल्या अधिकृत स्कोअरकार्डनुसार, बँकेने आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये डिजिटल व्यवहाराचे १२० टक्के लक्ष्य साध्य केले - जे भारतातील सर्व खासगी क्षेत्रातील बँकांमध्ये सर्वाधिक आहे. डिजिटल पेमेंट्स पुरस्कार समारंभात इंडसइंड बँकेच्या श्री. रितेश राज सक्सेना, डायरेक्ट बँकिंग प्रमुख आणि श्री. देव रतन सुरी, प्रमुख - एसडीजी (पेमेंट्स, कार्ड्स आणि सरकारी व्यवसाय) यांना श्री. एम. नागराजू, सचिव, वित्तीय सेवा विभाग आणि डॉ. अभिजित फुकोन, आर्थिक सल्लागार, डीएफएस यांनी हा पुरस्कार प्रदान केला.

या कामगिरीबद्दल इंडसइंड बँकेचे ग्राहक बँकिंग आणि विपणन प्रमुख सौमित्र सेन म्हणाले, "हा पुरस्कार आम्हाला दिल्याबद्दल आणि देशभरात डिजिटल स्वीकार वाढवण्यासाठी इंडसइंड बँकेच्या प्रयत्नांना मान्यता दिल्याबद्दल आम्ही अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाचे आभारी आहोत. आयएनडीआयइ सारख्या आमच्या वेगळ्या प्लॅटफॉर्मद्वारे सतत नावीन्यपूर्ण आणि आमच्या ग्राहकांना अंतर्ज्ञानी, सुरक्षित आणि वैयक्तिकृत बँकिंग अनुभव देण्याच्या आमच्या संकल्पाला ही मान्यता बळकटी देते. भारताच्या डिजिटल प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी बँकिंग सुलभ आणि सहज बनवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत." डिजिटल २.० धोरणाअंतर्गत, इंडसइंड बँकेने अखंड, सर्वसमावेशक आणि नावीन्यपूर्ण आर्थिक अनुभव देत आहे. आमचे प्रमुख ॲप, आयएनडीआयइ हे ॲप स्टोअरवरील सर्वाधिक रेटेड ॲप आहे. १. ६ दशलक्ष सक्रिय वापरकर्त्यांसह रिटेल बँकिंगची पुनर्परिभाषा करत आहे. पूर्णपणे डिजिटल होण्याच्या प्रवासांतर्गत बँकेच्या डिजिटल क्रेडिट प्लॅटफॉर्मने दरमहा १. २ दशलक्ष अर्जांवर प्रक्रिया केली. ९३ टक्के (३१ मार्च २०२५ पर्यंत) एकूण डिजिटल व्यवहारांसह, इंडसइंड बँक भारतातील डिजिटल पेमेंट क्षेत्रात आघाडीवर आहे.

# हरवले आहे

राजशेखर रामेश्वर सुरवसे वय 26 वर्षे धंदा - शिक्षण रा शिवाजी नगर सेलू जि.परभणी हे दि.16 जुन 2025 रोजी पुणे ते सेलू रेल्वेने प्रवास करत होते. पुणे एक्स्प्रेस सेलू येथे 17 जुन 2025 रोजी सकाळी 8:25 वा.अंदाजे पोहोचली रेल्वेतून उतरत असताना कागदपत्रे असलेली काळ्या रंगाची बॉग त्यामध्ये आधार कार्ड,10 वी पास ची गुणपत्रिका, पॉनकार्ड, व इतर कागदपत्रे होती.ती बॉग प्रवासी लोकांच्या गर्दीमधुन उतरत असताना हरवली आहे.तरी सापडल्यास दिलेल्या पत्त्यावर कळवावे.

# प्रबळगड माची येथे "योग विथ आमदार प्रशांत ठाकूर" उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**



जागतिक योग दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता युवा मोर्चा पनवेलच्या वतीने पनवेलजवळील प्रबळगड माची या निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळी आयोजित करण्यात आलेल्या "योग विथ आमदार प्रशांत ठाकूर" या विशेष उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, प्रांताधिकारी पवन चांडक, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्यासह शेकडो युवक, महिला, स्थानिक नागरिक, तसेच विविध संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून दिनांक २१ जून २०१५ रोजी पहिला जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. योग साधनेतून मिळणाऱ्या अनन्यसाधारण लाभांमुळे योग जगात सर्वत्र लोकप्रिय झाला आहे. भारतीय ऐतिहासिक परंपरेचा अमूल्य ठेवा म्हणजे योग आहे, जो भारताने पूर्ण विश्वाला प्रदान केला आहे. त्या अनुषंगाने योग दिनाचे महत्व लक्षात घेता माची प्रबळगड येथे योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आरोग्य सेवा समिती पनवेल यांच्यावतीने मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके यांनी योग संदर्भात मार्गदर्शन तसेच प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्यासमवेत सहाय्यक शिक्षक नैना म्हात्रे, प्रसाद गोडांबे, भारती गोडांबे यांचाही सहभाग होता. प्रबळगड माची, सह्याद्रीच्या कुशीत वसलेले, निसर्गाच्या सान्निध्यातील एक शांत आणि ऊर्जादायी जागा आहे. येथे योगाभ्यास करताना शरीर आणि मन दोघांनाही नवचैतन्य मिळते. ऐतिहासिक ठिकाणी योगसाधना करताना निसर्गाशी नाते जपण्याची, आणि आत्मिक शांतता अनुभवण्याची संधी मिळते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने प्रबळगड माची येथे सुरू झालेला हा उपक्रम एक परंपरा बनला असून, आरोग्य, युवक सशक्तीकरण आणि सांस्कृतिक जतन याला वाहिलेला आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही योगप्रेमींना एकत्र आणून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विविध योगासने, श्वसन तंत्रे आणि ध्यानधारणा यांचे सत्र पार पडली. यावेळी माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पनवेल पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, शिवकर ग्रामपंचायत सरपंच आनंद ढवळे, माजी सरपंच संगिता भुतांबरा, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, केदार भगत, राकेश भुजबळ, रोहित जगताप, चिन्मय समेळ, मयूर कदम, तेजस जाधव, देवांशु प्रबाळे, अक्षय सिंग, विवेक होन, शुभम कांबळे, यांच्यासह अनेक पदाधिकारी व निसर्गप्रेमी सहभागी झाले होते. मागील काही वर्षांमध्ये झालेल्या योग प्रचाराचा आढावा घेतला असता, योग प्रशिक्षणाची मागणी सर्वत्र वाढत आहे, योग कडे बघण्याचा शास्त्रीय दृष्टीकोन वाढीस चालला आहे. सर्व जगाला जोडण्याची ताकद योग शास्त्रामध्ये आहे, भारतीय परंपरेने आपल्याला प्राप्त झालेल्या या शास्त्राचा आदर करून, याचे आपल्या दैनंदिन आयुष्यातील महत्व ओळखून योग जीवन शैली आयुष्यात प्रत्यक्षपणे आणण्याचा प्रयत्न केला जात असून त्याचा जगभरात प्रचार आणि प्रसार करण्याचे काम होत आहे.

# जासई विद्यालयात जागतिक योग दिन कार्यक्रम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग,जासई.ता.उरण जि.रायगड या विद्यालयात 21 जून हा जागतिक योग दिन कार्यक्रम संपन्न झाला.

विद्यालयाच्या प्राचार्या सौ.म्हात्रे के.जी. मॅडम यांनी या कार्यक्रमासाठी लाभलेले योग मार्गदर्शक श्री.शशिकांत म्हात्रे सर,सेवानिवृत्त पर्यवेक्षक, जे.एन.पी.टी. शाळा यांचे स्वागत केले. त्यांनी आरोग्याचे महत्व सांगून ,योग आणि व्यायाम ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना केले. विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सर्व विद्यार्थ्यांना योगाची माहिती सांगून श्री. शशिकांत म्हात्रे सर यांनी विविध योगाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून व सर्व सेवकांकडून करवून घेतली. या कार्यक्रमा साठी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. कुठे सर ,पर्यवेक्षिका सौ.मुकादम मॅडम व सर्व सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्याचे आभार प्रा.गाताडी एस.बी.यांनी करून कार्यक्रमाची सांगता झाली.



## ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ येथे जागतिक योगा दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

आरोग्यम धनसंपदा २१ णून जागतिक योगा दिन संपूर्ण जगात साजरा केला जातो. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन. योगाने शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक लाभ होतो. आज प्रत्येक जण आधुनिकता आणि तंत्रज्ञानाच्या युगात अडकून पडलेला आहे त्यामुळे त्याचे स्वतःच्या शारीरिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष होत आहे. याच करिता महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत योगाचे महत्व टिकून राहावे त्यांच्या मनावर बिंबावे याकरिता ओरिएंटल कॉलेज ऑफ लॉ सानपाडा नवी मुंबईV येथे आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा २१ जून २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद देत योगाच्या आसनांचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच विद्यार्थ्यांसोबतच महाविद्यालयातील मुख्याध्यापक गोरधन देवनानी तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हेसुद्धा या उपक्रमामध्ये सहभागी झाले. एकंदरीत आंतरराष्ट्रीय योगा दिन मोठ्या उत्साहात प्रत्येक विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सदर योग दिन उपक्रमाचे आयोजक प्रा फसीहूर रहमान सर यांनी केले होते. महाविद्यालयातील मुख्याध्यापक यांनीही विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले.





# सौ.निर्मला मचाले यांना मिळाला आदर्श शिक्षक पुरस्कार ग्रामस्थांनी केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

सणसर ता.इंदापूर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका निर्मला रमेश मचाले यांना पुणे जिल्हा परिषदेचा मानाचा समजला जाणाऱ्या जिल्हा आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित एका कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलमताई गोरे,विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासो बनसोडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार,



जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी, सीईओ गजानन पाटील, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित होते. पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने विविध 100 निकषांची तपासणी जिल्हा परिषदेच्या समितीमार्फत करून हा पुरस्कार देण्यात येतो.यामध्ये निर्मला मचाले यांनी सणसर येथील प्राथमिक शाळेत उल्लेखनीय कार्य करत मुलांच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न, प्रज्ञाशोध परीक्षेत सहभाग, वर्गातील मुलांचा तालुक्यात गुणवत्ता यादीत समावेश, मुलांना हसत खेळत शिक्षण देण्याकडे त्यांचा विशेष कल असतो. सौ.निर्मला मचाले या मराठी साहित्यात पीएचडी करत आहेत.त्यांचा पीएचडी चा विषय मराठी बालकथा साहित्याचा वाङ्ममययीन अभ्यास हा आहे.त्यांचे आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये बालकथांचे बालकांचे जीवनातील स्थान व बालकथा वाङ्मयीन अभ्यास हे दोन शोधनिबंध प्रकाशित झाले आहे. आपल्या 23 वर्षाच्या ज्ञानदानाच्या सेवाकाला मध्ये कविता लेखन,चारोळी लेखन, साहित्य लेखन हे छंद जोपासले आहेत.नुकताच त्यांचा नवांकुर हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे.मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांचे वतीने दिला जाणारा यंदाचा गौरव अभिजात मराठीचा हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. राज्यस्तरीय कविता गायन स्पर्धेतही त्यांना सहभाग घेण्याची संधी मिळाली. गावच्या प्राथमिक शाळेचा नावलौकिक वाढल्याने सणसर ग्रामस्थ,मुख्याध्यापक,सर्व शिक्षक यांचेसह व्यवस्थापन समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## जिल्हाधिकारी साहेब दिसते तसे नसते, म्हणूनच जग फसते...

### जिल्हाधिकाऱ्यांच्या आगमना निमित्त पाटोद्यात ‘सजावट’, मात्र वास्तव वेगळंच

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** – बीड जिल्हाधिकारी साहेबांचा तहसील कार्यालय, पाटोदा येथे नुकताच दौरा झाला. त्यांच्या आगमना निमित्त तहसील कार्यालयात अचानकच साफसफाई, रंगरंगोटी आणि सजावटीचा धडाका दिला गेला. एरवी गोंधळ, अस्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीने त्रस्त असलेले हेच कार्यालय एका दिवसात ‘चकाचक’ करण्यात आलं. सामान्य नागरिकांच्या मते, हे केवळ एक 'दिसावं तसं' रूप होतं – कारण प्रत्यक्षात कार्यालयीन कारभार व कर्मचारी उपस्थिती विषयी तक्रारी सातत्याने येत असतात. पण जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीच्या वेळी सर्व काही सुरळीत असल्याचं चित्र उभं करण्यात आलं. या वेळी जिल्हा परिषद जरेवाडी शाळेला भेट देण्यात आली,



जी पूर्व नियोजित असल्याचं स्पष्ट होते कारण याच पाटोदा तहसील कार्यालयाच्या शेजारी असलेली जिल्हा परिषद हायस्कूल शाळा गेल्या काही वर्षांपासून बंद आहे, हे प्रशासनातील कोणाच्याच लक्षात आलं नाही. तसेच पाटोद्यातील जिल्हा परिषद कन्या शाळेत शिक्षकांची कमतरता असून ही त्या कडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. या वर शिक्षण विभाग प्रशासनाच्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष का करते असे प्रश्न पत्रकारांनी विचारताच या वर जिल्हाधिकाऱ्यांनी मला जास्त माहिती नाही म्हणून उत्तर देणं टाळले. तसेच काही नागरिक जिल्हाधिकारी यांच्या कडे आपली तक्रार घेऊन आले मात्र त्यांना योग्य उत्तर नाही मिळाल्याने असमाधानी होऊन ते परत गेले या वर एक नागरिकांनी प्रतिक्रिया दिली "प्रशासना समोर खोटं चित्र सादर केलं जातं आणि खरी अडचण मुळातूनच लपवली जाते," या प्रकारामुळे ‘कागदोपत्री विकास’ आणि ‘खऱ्या अडचणींची’ दरी पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.

## पत्रकार विशाल भालेराव यांना राज्य स्तरीय पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**किनवट ता.प्रतिनीधी:-**



तालुक्यातील करंजी ( इ) येथील पत्रकार विशाल भालेराव यांना मातृभूमी सोसल फाउंडेशन व झेप फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य स्तरीय पुरस्कार जाहीर झालेले पत्र १८ जुन २०२५ रोजी प्राप्त झाले आहे. पत्रकार विशाल भालेराव यांनी आपल्या लेखनातून सर्व सामान्यांना न्याय मिळवून दिले, व इतर सामाजिक कार्याची दखल घेत मातृभूमी सोसल फाउंडेशन व झेप फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य स्तरीय पुरस्कार जाहीर झाले आहे ,पत्रकार विशाल भालेराव हे सामान्य कुटुंबात जन्मले असून त्यांनी आपल्या लेखणीतून समाजाची उन्नती व प्रगती साठी अहोरात्र परिश्रम घेतले आहे.
या कार्याची दखल घेत मातृभूमी सोसल फाउंडेशन व झेप फाउंडेशन पुणे यांच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जि.प.प्राथ.शाळा तोरणडोंगरी शाळेत योग दिवस मोठया उत्साहात साजरा..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : राजेंद्र टोपले , सुरगाणा**

जि.प.प्राथ.शाळा तोरणडोंगरी ता.सुरगाणा या शाळेमध्ये 21 जून आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक दिगंबर चौधरी होते. शाळेतील सर्व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी खूप उत्साही होते. शाळेमध्ये सकाळी शाळेतील शिक्षक श्रीकांत गवळी यांनी योगाविषयीची माहिती दिली तसेच श्री रामदास भोये यांनी योगाची विविध प्रात्यक्षिके करून दाखवत विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. योगाचा इतिहास व जीवनातील उपयोगिता कथन करताना योगाच्या माध्यमातुन आपण स्वतःला कसे निरोगी व आनंदी ठेवू शकतो याविषयीची सविस्तर माहिती पंडित गायवन यांनी दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दिगंबर चौधरी,शिक्षक पंडित गायवन,पुंडलिक चौधरी,रामदास भोये,श्रीकांत गवळी,मनोहर भोये,गणेश पाडवी व शाळेतील विद्यार्थी, पालक सहभागी झाले होते.




# सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचा एकमेकांशी यथायोग्य समन्वय आणि संसूचन साधणे होय. याच धर्तीवर २१ जून हा दिवस भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात आणि विश्वभर ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ म्हणून साजरा केला जातो. सदर दिवसाच्या औचित्याने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) च्या जिमखाना असोसिएशन, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन तथा विस्तार विभाग आणि आर्ट ऑफ लिव्हींग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘योग सत्राचे’



आयोजन शनिवार,दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ६:४५ वाजता महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात करण्यात आले. सदर सत्राची सुरवात योग प्रशिक्षकांच्या स्वागताने झाली, यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी आर्ट ऑफ लिव्हींगचे योग प्रशिक्षक श्री. चंद्रशेखर सापळे, श्री. संजय म्हात्रे आणि श्री. कुणाल पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सर्व उपस्थितांना संबोधित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील यांनी ‘शरीर आणि मन दोन्ही नैसर्गिक पद्धतीने निरोगी ठेवण्यासाठी योगसाधना करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि एन.सी.सी. च्या ५२ कॅडेट्सनी वृक्षासन, ताडासन, अनुलोक-विलोम, प्राणायाम आदी उत्स्फुर्तपणे सादर करत 'एक पृथ्वी- एक आरोग्यासाठी योग' या संकल्पनेतून सर्वांगीण कल्याण आणि पर्यावरणीय सुसंवाद वाढवण्यात योग्य विद्येचे अनन्य साधारण महत्व आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ.बी.डी.आघाव , वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. एस.बी. यादव, जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही.बी. नाईक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अध्यक्ष डॉ. आर. व्ही. येवले, नॅशनल कॅडेट कॉर्प्स च्या असोसिएट एन.सी.सी. ऑफिसर प्रा. एन. पी. तीदार, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे अध्यक्ष डॉ. एस. एन. वाजेकर, विभागांचे विभागप्रमुख, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, योगसत्राचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. व्ही. पाटील तर आभार प्रदर्शन जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. व्ही.बी. नाईक यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिमखाना समिती, राष्ट्रीय सेवा योजना, नॅशनल कॅडेट कॉर्प्स, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग या समितीमधील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कोण आहेत डॉ.राहुल गेठे सलग तिसऱ्यांदा सकाळ सन्मान पुरस्कार

### पटकवलेले एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.राहुल गेठे, चला तर जाणुन घेऊयात डॉ.राहुल गेठे म्हणजे नक्की आहेत तरी कोण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

माजी मुख्यमंत्री आणि आताच्या घडीचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे 'ओएसडी' असलेल्या डॉ. राहुल गेठे हे आता नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आहेत. अनधिकृत डान्सबार असलेल्या अतिक्रमणांवर बेधडक कारवाई करून आधी शिंदे सरकारमध्ये दरारा वाढवलेल्या डॉ. राहुल गेठें मुळे डान्सबारमालकांना चांगलीच धडकी भरली आहे. डॉ. राहुल गेठे हे राजकीय वर्तुळात चर्चेत आले. शिंदे 'मुख्यमंत्री' होताच डॉ. राहुल गेठे हे त्यांचे 'ओएसडी' झाले. तेव्हाच, डॉ. राहुल गेठेंनी 'सीएमओ' त आपली छाप पाडली आणि शिवसेनेसह इतर पक्षांतील आमदारांसोबत संबंध वाढवले. या सरकारच्या काळात घडलेल्या चांगल्या-वाईट घडामोडीत डॉ. राहुल गेठेंनी आपली कामगिरी ठळक केली. त्यामुळेच 'सीएमओ' म्हणजे, डॉ. राहुल गेठे हे समीकरण दिसून आले. याच



काळात सीएमओ पाठोपाठ डॉ. राहुल गेठे यांच्याकडे नवी मुंबई महापालिकेच्या उपायुक्तपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. या पदावर बसतानाच डॉ. गेठेंनी शहरातील अतिक्रमणांना टार्गेट केले आणि ती जमीनदोस्त करण्याचा सपाटा लावला. तसेच अनधिकृत डान्सबार्स जमिनदोस्त करण्यात डॉ. राहुल गेठेंची महत्वाची भूमीका राहिली.

काही काळापुर्वी त्यांना जिवे मारण्याचा धमक्या सुद्धा आलेल्या होत्या पण डॉ.राहुल गेठे यांनी कुठल्याही धमक्यांना भिक न घालता आपले काम जोमाने सुरू ठेवले;तसेच पुण्यात पोर्श प्रकरण घडताच बेकायदा विशेषतः अमली पदार्थ, डान्सबार आणि रात्री-अपरात्री सुरू राहणाऱ्या हॉटेलवर कारवाईचा पवित्रा घेत, एकनाथ शिंदेंनी काळे धंदे बंद करण्याची ताकीद प्रशासनाला दिली. याचा फायदा उठवून डॉ. राहुल गेठेंनी नवी मुंबई महापालिकेतील बेकायदा डान्सबार पाडले. त्यावरून संतापलेल्या डान्सबार मालकांनी थेट मुख्यमंत्री शिंदेंना भेटून, डॉ. राहुल गेठेंच्या वर्किंग स्टाइलवर बोट ठेवले. त्यानंतर आपल्या पध्दतीने कारवाई सुरू ठेवून डॉ.राहुल गेठेंनी बारमालकांना धडा शिकवला. हेच डॉ.राहुल गेठे पुढे जाऊन नवी मुंबई महापालिकेत अतिरिक्त आयुक्त झाले त्यामुळे डॉ. राहुल गेठे या नावामुळे बारमालकांची नशा उतरली आहे हे नक्कीच.

# पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे सोन्याच्या दागिन्यांची पिशवी मिळाली परत

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

पनवेल शहर पोलिसांच्या तत्परतेमुळे एका महिले कडील सोन्याच्या दागिन्यांची पिशवी हरवली होती ती तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे परत मिळून सदर महिलेला ती परत करण्यात आली आहे. पनवेल शहर पोलीस ठाणे येथे मेघा नरेश पाटील, (राहणार भाताण) यांनी पोलीस ठाणे येथे येऊन सांगितले की त्यांचे सोन्याचे दागिने हे भाताण ते जवेरी बाजार अशा प्रवासादरम्यान कुठेतरी पडून गहाळ झाले आहेत. सदरचे सोन्याचे दागिने हे पनवेल येथे गहाण ठेवून त्या बदल्यात पैसे घेऊन मुलाच्या शाळेची फी भरायची होती परंतु त्यापूर्वीच दागिने हे कोठेतरी पडून गहाळ झाले आहेत. सदरचे दागिने सापडले नाही तर मुलाची शाळेची फी भरता येणार नाही असे बोलून जोरजोराने रडू लागल्या. सदर महिलेच्या तक्रारीची त्वरित दखल घेत त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार नोंदवून पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू केला. सदर



तपासा दरम्यान जवळपास 35 ते 40 सीसीटीव्ही कॅमेरे चेक करून त्यांचे गहाळ झालेले सोन्याचे दागिने हे एक अनोळखी व्यक्तीस सापडले आहे असे सीसीटीव्ही फुटेज तपासताना निदर्शनास आले. त्यानंतर सदर अनोळखी व्यक्तीचा शोध सुरू करून पुढील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर गुप्त बातमीदारांमार्फत देखील सदर अनोळखी व्यक्तीचा शोध सुरू केला. त्यानुसार सदर अनोळखी व्यक्तीची ओळख पटवून त्यास ताब्यात घेतले व त्यानंतर त्याने सदर महिलेचे हरवलेले सोन्याचे दागिने हे त्याला रस्त्यावर पडलेले सापडल्याचे कबूल केले. त्यानुसार सदर इसमाने ते दागिने पनवेल शहर पोलिसांना परत केले. त्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी सदर महिलेस पोलीस ठाणे येथे बोलावून तिचे गहाळ झालेले सोन्याचे दागिने हे तिला परत केले. सदर चे दागिने महिलेस परत मिळाल्यानंतर तिने वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सपोनी प्रकाश पवार, तुषार बोरसे, अमोल पाटील, संदेश म्हात्रे, महेश पाटील, माधव शेवाळे, परेश म्हात्रे, मिथुन भोसले, विशाल दुधे, किरण कराड तसेच पोलीस मित्र रमिज पटेल व पोलीस मित्र सद्दाम मुल्ला यांचे आभार मानले आहेत. पोलिसांनी तत्परतेने दागिन्यांची पिशवी परत मिळवून दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## कृष्णाई युवा मंचच्या वतीने वारकऱ्यांना सकाळी डोसा उत्तप्पा साबण तेल पावसाळी रेनकोट आदींचे वाटप,

**दैनिक युवक आधार**
**पुणे प्रतिनिधी शंकर जोग,**

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची पालखी आज पुण्यात मुक्कामी असताना वारकऱ्यांसाठी रास्ता पेठ येथील कृष्णाई युवा मंच च्या वतीने सकाळी मसाला डोसा उत्तप्पा खोबरे तेलचे बॉटल साबण आदींचे वाटप मा जी आमदार मोहन दादा जोशी त्यांच्या हस्ते करण्यात आले,

यावेळी माजी गृहराज्यमंत्री रमेश दादा बागवे, अजय बापू भोसले, कृष्णाई युवा मंचचे अध्यक्ष उदय मोहिते, प्राध्यापक वाल्मीक जगताप वसंत धारवे, पुणे शहर काँग्रेस कमिटी इंटरचे अध्यक्ष चेतन अग्रवाल, बापू खरात, सचिन धिवार, नवीन सिंह, अरुण धारवे, योगेश राऊत, अखिल ठक्कर, अजय मोरे, गणेश दरडीगे, तुषार कांबळे, राजेंद्र राठोड, मनोज नायर, अमर राठोड, आदि यावेळी उपस्थित होते



## येणवे बुद्रुक येथे अतिवृष्टीमध्ये गाभण म्हशीचा पाय घसरून पुराच्या पाण्यात मृत्यू..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे.**





दिनांक 19 रोजी येथील शेतकरी श्री विश्वनाथ बाजीराव घोंगे हे गुरे चारण्यासाठी गेले असता त्यांची म्हशीचा अचानक पाय घसरून ओढ्यामध्ये पाण्याच्या प्रवाहात पडली पाण्याचा प्रवाह पुढे तिचा काहीच फायदा झाला नाही ग्रामस्थांनी देखील हातूनच प्रयत्न करून तिला काढण्याचा प्रयत्न केला परंतु ग्रामस्थांना वाचवण्यात अपयश आले श्री विश्वनाथ घोंगे यांची म्हैस एक लाख तीस हजाराला खरेदी केली होती वरील सर्व प्रकार घडल्यानंतर श्री विश्वनाथ घोंगे खेड पंचायत समितीचे पशुसंवर्धन विकास विस्ताराधिकारी डॉ. योगेश शेळके यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी क्षणाचा विलंब न लावता ताबडतोब वाडा येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रेरणा मुळूक व डॉ. अविनाश पवार पशुधन विकास अधिकारी डेहेणे तसेच डॉ. वेदांत ओव्हाळ या सर्वांनी येणवे येथे धाव घेऊन म्हशीचे शवविच्छेदन केले याप्रसंगी येणेवे गावचे ग्रामस्थ उल्हास शेठ घोंगे शिक्षण कमिटी अध्यक्ष संतोष घोंगे तंटामुक्ती अध्यक्ष गणेश कडू गुलाब घोंगे चेअरमन किसन कडू देवकाकाळे सोपान धंद्रे गंगाराम घोंगे इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई -वार्ताहर**

शनिवारी २१ जून रोजी खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये मोठ्या उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. ६० हून अधिक नागरिक व कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले होते. योगाभ्यासाद्वारे उपस्थितांना दैनंदिन जीवनशैलीत योग्यभ्यासाच्या सरावाचे फायदे सांगण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये केवळ उपचारांबद्दल नाही तर प्रतिबंध आणि निरोगी जीवनशैलीबाबतही वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. हे योग सत्र याचे एक उदाहरण ठरले आहे. लोकांना निरोगी सवयी स्वीकारण्यास आणि त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यास प्रेरित करणारे असे आणखी उपक्रम हाती घेण्याचे आमचे ध्येय असल्याची प्रतिक्रिया *मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रदेशाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल यांनी स्पष्ट केले.*



# तळा ज्युनियर कॉलेज व हायस्कूलमध्ये जागतिक योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे गो म वेदक विद्यामंदिर आणि कला - वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा येथे २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक कसबे पी पी, प्राध्यापक वाडीकर के जे, गो म वेदक विद्यामंदिरचे पर्यवेक्षक श्री महादेव लोकरे, शिक्षक श्री रोहीत भागवत, श्री महेश राठोड यांनी टाळ्या वाजवणे, ताडासान, मसल स्ट्रेंथ, सुर्यनमस्कार, प्राणायम आदी योगासनांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.



यावेळी शिक्षकांनी योगाचे महत्त्व समजावून सांगितले. योगामुळे लवचिकता, ताकद, संतुलन आणि मुद्रा सुधारते. हे तीव्र वेदना व्यवस्थापित करण्यात, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्य सुधारण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यात मदत करू शकते. ध्यान आणि श्वासोच्छवासाच्या व्यायामासारख्या योगासनांमुळे तणाव, चिंता आणि नैराश्य लक्षणीयरीत्या कमी होऊ शकते. हे चांगल्या झोपेला प्रोत्साहन देऊ शकते, फोकस सुधारू शकते आणि एकूण मूड सुधारू शकते. योग शरीर जागरूकतेची भावना विकसित करतो आणि व्यक्तींना त्यांचे श्वास हालचालींशी जोडण्यास शिकवतो. हा सर्वांगीण दृष्टीकोन स्वत: ची सखोल समज आणि कल्याणाची अधिक जाणीव निर्माण करतो. योगास समर्पण आणि सातत्यपूर्ण सराव आवश्यक आहे. कालांतराने, ते स्वयं-शिस्त आणि सिद्धीची भावना वाढवते. वैयक्तिक वाढीसाठी आणि आत्म-शोधासाठी हे एक शक्तिशाली साधन देखील असू शकते. असे महत्व सांगून अधिक माहितीसाठी अभ्यास करावा असे आवाहन केले.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी आहे. 'आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५' हा दिवस साजरा करण्यासाठी आणि योगाच्या सरावाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी तळा महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री दिलीप ढाकणे, गो म वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## पनवेल मध्ये महावितरणाचा स्मार्ट मीटर बसवण्याचा मनमानी कारभार

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी

स्मार्ट मीटर म्हणजे वीज वापरायचे डिजिटल मीटर असतात. जे रियल टाईम मध्ये वीज वापर मोजतात आणि विद्युत वितरण कंपन्यापर्यंत ऑटोमॅटिक पाठवल्या जातात. स्मार्ट मीटर बसवताना ग्राहकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे व ग्राहकाची संमती घेणे आवश्यक आहे. शासकीय नियमानुसार ग्राहक घरगुती वापरासाठी पारंपारिक मीटर असेल तर परवानगी घेणे बंधनकारक आहे. MSEDL यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे की उच्च कार्यक्षम प्रणालीचा भाग आहे पण ग्राहकांची माहिती व संमती घेतली पाहिजे.



शासनाच्या नवीन धोरणानुसार मीटर बसवण्याची संकल्पना आली पण नवीन मीटर बसवताना जुने मीटर काढून टाकले जाणार याची सुद्धा कल्पना नाही.व त्या ऐवजी नवीन स्मार्ट मीटर बसले जाणार याची कल्पना कोणत्याही कागदपत्राद्वारे व मोबाईल द्वारे घरमालकाला कळवण्यात आलेली नाही. त्यामुळे कोणतेही कल्पना नसलेल्या घरमालकांनी आपला मीटर नंबर तरी काय? याचा उपयोग कसा करायचा? त्याचे आर्थिक निधी महावितरण घेणार का? असे अनेक प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाले आहेत. आजीवली येथील महावितरणाचा कारभार भिंगरी येथून चालवला जातो. स्मार्ट मीटर बसवण्याचा मनमानी कारभार चालला आहे. याला जबाबदार कोण? अधिकारी वर्ग मीटर बसवण्याचे कॉन्ट्रॅक्ट देतात पण त्याची परिपूर्ण अंमलबजावणी होते का? प्रत्येक नागरिकाला कागदोपत्री कल्पना देणे गरजेचे आहे. सामान्य जनतेला या भोंगळ्या कारभारामुळे वेटीस धरले आहे असे स्पष्ट मत नागरिकांमधून मांडले जात आहे. MSEDL पनवेल तालुक्यातील अधिकाऱ्यांनी तातडीचे लक्ष घालून अंमलबजावणी करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## स्व.सुमन साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रायगड जिल्हापरिषद शाळा वडघर येथे खाऊ व वह्या वाटप कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्यावतीने मातोश्री स्व. सुमन साळुंखे यांच्या स्मृती दिनानिमित्त रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडघर येथे मोफत वह्या व खाऊ वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. महेश साळुंखे हे दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटप ,खाऊचे वाटप तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व त्यांना सहकार्य करणे असे समाजोपयोगी कार्यक्रम करत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम ते करत असतात.



सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार संजय कदम, पत्रकार अनिल कुरघोडे, सामाजिक कार्यकर्ते बाबा नाईक, जावेद मास्टर, निलेश कांबळे, समाधान कांबळे ,भारत दाताड, चंद्रकांत वेळासकर, मनोज कांबळे, शाळेचे मुख्याध्यापक प्रफुल्ल थळे, पदवीधर शिक्षक किशोर पाडगे, शिक्षिका शारदा डंगर, शिक्षक जयदास घरत, जनार्दन पाटील, विश्वनाथ पाटील, प्रतिभा कासारे आदी मान्यवर उपस्थित होते. महेश साळुंखे यांच्या मातोश्री स्व.सुमन साळुंखे यांच्या आठवणी निमित्त दरवर्षी मोफत वह्या वाटप कार्यक्रम असतो. त्याचप्रमाणे महेश साळुंखे यांच्या वाढदिवस निमित्त दरवर्षी गुणवंत विद्यार्थी सत्कार असतो. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या मुला- मुलींना खाऊचे व वह्यांचे वाटप उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

# क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचे धरणगाव येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन

**दैनिक युवक आधार**
**जळगाव जिल्हा प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

धरणगाव येथे उभारण्यात आलेल्या क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मारकाची कोनशिला अनावरण करून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी स्मृतीस्थळाची पाहणी केली. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी खाज्याजी नाईक यांच्या स्मृती मंदिराला भेट देऊन अभिवादन केले. खाज्याजी नाईक यांनी १८५७ च्या समरात भिल्ल जमातीचे ३० हजार लढवय्ये उभे करून महाराष्ट्र व मध्यप्रदेशात मोठा लढा दिला. त्यांच्या लढ्यामुळे इंग्रजांची सत्ता हादरली. इंग्लंडहून त्यांना ठार करण्याचे आदेश आले. त्यांच्यावर त्या काळी दोन हजार रुपयांचे बक्षीस ठेवले होते. त्यांनी इंग्रजांचा खजिना लुटून शस्त्र खरेदी केली. 'जिथे अन्याय, तिथे खाज्याजी नाईक' हे समीकरण बनले होते. अंबापाणीच्या लढाईत महिलांनीही शौर्य दाखवले. खाज्याजी नाईक अधिक काळ जगले असते तर कदाचित इंग्रजांना भारत सोडावा लागला असता, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले, क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतीस्मारक अत्यंत सुंदर झाले आहे. राणी दुर्गावती, भगवान बिरसा मुंडा, सिद्ध-कान्हू, तंट्या मामा, झलकारी बाई, राघोजी भांगरे, भिमा नाईक, रुमाल्या नाईक, राणा पुंजा भिल, यांच्यासारख्या अनेक नायकांचे दर्शन या स्मारकात घडते. हे स्मारक केवळ ऐतिहासिक नाही, तर येथे आश्रमशाळा असून अस्मिता जागवण्याचे कार्यही केले जाते. भविष्यात येथे महिलांसाठी कौशल्य विकास व फळप्रक्रिया प्रशिक्षण केंद्र उभारले जाईल पतप्रधान नरेंद्र मोदी याच्या पुढाकारान सुरू झालेल्या 'धरती आबा' योजनेंतर्गत राज्यातील आदिवासी गावांमध्ये १७ प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी होणार आहे. केंद्र शासनाने यासाठी ८० हजार कोटी रुपये मंजूर केले असून, पुढील ५ वर्षांत एकही आदिवासी बांधव बेघर राहणार नाही. त्यांना शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगार व रस्त्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल," अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. गोर बंजारा समाजाने देशभरात बावड्या, तलाव व पाणवठे उभारून समाजसेवा केली आहे. अशा समाजाच्या प्रेरणास्थळी गोद्री येथे सरकारकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल," असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. कार्यक्रमात शरदराव ढोले, अनिल भालेराव, पद्मश्री पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतीस्मारक समितीचे सचिव विलास महाजन यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना गोद्री येथील प्रसंगांवर आधारित पुस्तक भेट देण्यात आले.याप्रसगीआयोजीत कार्यक्रमास कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, खासदार स्मिता वाघ, आ. सुरेश भोळे, आ. मंगेश चव्हाण, पद्मश्री चैत्राम पवार, अनिल भालेराव, शरदराव ढोले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते कौशल्याच्या बळावर श्रीपाद खंदारे यास पूरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी**
**. रणजित. ठाकुर**

वाशीम जिल्हा ता.मालेगाव तालुक्यातील सोमठाणा गावचे भूमिपुत्र अतिशय गरीब आणि हलकीच्या परिस्थितीमध्ये शिक्षण घेतलेले श्री ह. भ. प. शालिकराम महाराज खंदारे यांचा मुलगा श्रीपाद खंदारे याने वाहतूक नियंत्रणासाठी ट्रॅफिक बडी हे मोबाईल अप्लिकेशन विकसित केले आहे. पुण्यातील एमआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयात संगणक अभियांत्रिकीचा हा तृतीय वर्षातील विद्यार्थी असून त्याने या एप्लीकेशन प्रणालीचा उपयोग सध्या पुणे येथील पिंपरी चिंचवड या शहरात प्रायोगिक तत्त्वावर वापरता येईल अशा पद्धतीने सुरू केला आहे. प्राचार्य श्री महेश गौडर सर व मार्गदर्शिका वैशाली वांगीकर आणि पिंपरी चिंचवड विभागाचे डेप्युटी कमिशनर आदरणीय बापू बांगर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा



प्रोजेक्ट तयार करण्यात आला. विशेष म्हणजे श्रीपादचे वडील याच संस्थेच्या मुख्य शाखेमध्ये एमआयटी विश्वशांती विद्यापीठ कोथरूड या ठिकाणी सेवारत आहेत. विश्वशांती केंद्राच्या वतीने आदरणीय डॉक्टर विश्वनाथरावजी कराड सर यांच्या अनेक अध्यात्मिक व सामाजिक कार्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. आळंदी, देहू, पंढरपूर, लातूर, नाशिक, हरिद्वार, ऋषिकेश, विज्ञान भवन दिल्ली, बद्रीनाथधाम, नेपाळ मधील काठमांडू या ठिकाणी कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून त्यांना जाण्याचा योग आलेला आहे.

या प्रणालीत नागरिक जेथे असतील तिथे फोटो पाठवू शकतात. काही सेकंदात आपली तक्रार व माहिती संबंधित विभागाला (एआय) तंत्रज्ञानामुळे लगेच मिळणार आहे. विशेष म्हणजे हे आपण व्हाट्सअप वरच करू शकतो. यासाठी वेगळे अप डाऊनलोड करण्याची कुठलीही गरज नाही. त्यामुळे कुणीही व्यक्ती या अप्लिकेशनचा वापरू शकतो. यासाठी वरिष्ठ स्तरावर विभागाची निर्मिती केल्यामुळे तत्काळ समस्यांचे निवारण व निराकरण होणार आहे. संबंधित विभागाच्या मुख्य डॅशबोर्ड वरून रिअल टाइम कामकाज बघता येणार आहे. सहाजिकच त्यामुळे त्यात, पारदर्शकता पण असणार आहे. या नाविन्यपूर्ण अप्लिकेशन प्रणालीमुळे पोलिस यंत्रणा व नागरिकांचा वेळ वाचून तत्काळ समस्या निवारण होण्यास मदत होणार आहे. पुणे जिल्ह्यासाठी ८७८८६४९८८५ या मोबाईल क्रमांकावर संदेश (मेसेज) पाठविल्यानंतर मराठी किंवा इंग्रजी दोन भाषांची निवड दिली आहे. जिल्ह्यांसाठी हा मोबाईल नंबर बदलू शकतो. यामध्ये आठ पर्याय दिले आहेत. वाहतूक उल्लंघन, रस्त्यांची दुरवस्था, सिग्नल ट्रॅफिक,अवैध पार्किंग, वाहतूक कोंडी, इतर अडचणी, उपाययोजना सुचविणे, ट्रॅफिक बडे(स्वयंसेवक) जोडणे असे आठ पर्याय दिलेले आहेत. या पर्यायांपैकी आपली जी समस्या असेल
तो पर्याय आपल्याला निवडायचा आहे. पर्याय निवडून संबंधित समस्येचा फोटो काढून या नंबर वर पाठविल्यानंतर तत्काळ तक्रार मिळाल्याची पोचपावती आपल्याला लगेच मिळते. तक्रार निवारण संबंधी काय कारवाई केली याचीही माहिती तक्रारदाराला पुरवली जाते. दूरदृष्टी आणि कल्पकता यांचा विचार करून महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या हस्ते श्रीपाद खंदारे यांचा प्रशस्तीपत्र देऊन देऊन संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याच्या दिवशी टाळगाव चिखली येथील टाऊन हॉल या ठिकाणी मंगळवार दिनांक 18 6 2025 रोजी सन्मान करण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा हा क्षण आहे नक्कीच ह्यातून आपल्या अबूतपूर्व गुणवत्तेमुळे विद्यार्थी आपलं यश संपादन करून इतरांपुढे प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून पुढे येऊ शकतो. या सर्व घटनेचा सोमठाणा तसेच वाशिम जिल्ह्यातील सर्व जनतेला स्वाभिमान आहे.

## साकोली -शेंदूरवाफा नगर परिषदेतील सर्व नाल्या व केर कचरा साफ करा :-वंचित बहुजन आघाडीचे मागनी

### साकोली येथील सी ओ यांना निवेदन



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** सध्या पावसाचे दिवस आहेत पावसाळा सुरू होत आहे त्यामुळे साकोली -शेंदूरवाफा येथील ज्या गटारे नाल्या आहेत त्या अजून स्वच्छ झालेले नाहीत. नाल्यावरील फरच्या फुटलेले आहेत .नाल्यामध्ये केरकचरा साठलेला आहे, पाणी तलावापर्यंत सुरळीत जात नाही .रस्त्यावर मलंदा ठेवलेला आहे ,मटेरियल ठेवलेला आहे, त्यामुळे लोकांना त्रास होतो. नगरपरिषदेतील शेंदुरवाफा ,साकोली येथील नगरपरिषदेने सर्वच्या सर्वच वार्डातील नाल्या साफ कराव्यात.व केरकरचा काढण्यात यावा, फुटलेल्या परश्या दुरुस्त करण्यात यावा ,अन्यथा वंचित बहुजन आघाडी तर्फे आंदोलन करण्याचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनातून देण्यात आलेला आहे. निवेदन मधून देण्यात आलेला आहे. याचा प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे डी जी रंगारी, महिला जिल्हा अध्यक्षा तनुजा नागदेवे, वंचित तालुका अध्यक्ष जगदीश रंगारी,महिला तालुकाध्यक्ष शितल नागदेवे, यादवराव गणवीर ,गणेश गजभिये, मोरेश्वर राऊत ,अमित नागदेवे, जिजा कोल्हे, सविता वालदे,कोकिळा रामटेके, गीता वलथरे, बबीता राऊत व इतर कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीची केली विक्री, दोघां विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

बनावट कागदपत्रांच्या आधारे दुसरी व्यक्ती उभी करून बनावट सही केली आणि खरेदीखत बनवून जमीन स्वतःच्या नावे करून तिची विक्री केल्याप्रकरणी प्रभाकर बंडू नाईक (डेरवली) आणि अंबावी रणछोड पटेल (राहणार सेक्टर 17 वाशी) यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 18 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संजय महागावकर हे गुजरात येथे राहत असून त्यांची व आईच्या नावे वाघाची वाडी आणि धोदाणी येथे जमीन आहे. 2023 मध्ये त्यांचा मुलगा आणि पत्नी हे घरपट्टी भरण्यासाठी गेले असता दोन्ही मिळकती त्यांच्या नावावर नसून त्या दुसऱ्याच्या नावावर झालेल्या असल्याचे समजले. त्यांनी या संदर्भात कागदपत्रे माहिती घेतली असता त्यांची आई नीला महागावकर ही 2008 मध्ये मयत असताना सुद्धा प्रभाकर नाईक यांनी तिच्या जागी दुसरी व्यक्ती उभी केली आणि त्यांच्या आईच्या खोट्या सह्या करून वाघाची वाडी या मिळकतीचे खोटे व बनावट खरेदीखत तयार करून सदरची मिळकत स्वतःचे नावे केली आणि आईच्या नावाचे भारत निवडणूक आयोगाचे खोटे ओळखपत्र तयार केले. या खरेदी खतात अंबावी रणछोड पटेल यांनी साक्षीदार म्हणून सही केली. 2015 रोजीच्या खरेदी खतात दोघांनी दुसरा साक्षीदार म्हणून संजय महागावकर यांना दाखवलेले आहे. मात्र खरेदीखत करताना ते उपस्थित नव्हते. त्याचप्रमाणे दोघांनी येथील मिळकतीच्या जागी संजय महागावकर त्यांच्या जागी दुसरी व्यक्ती उभी करून खोट्या सह्या केल्या आणि सदरची मिळकत अंबावी पटेल यांच्या नावे केली. या खरेदी खताचा साक्षीदार म्हणून प्रभाकर नाईक यांनी सही केली आहे आणि त्यानंतर ती मिळकत त्याने दुसऱ्या व्यक्तीला विकली आहे. फसवणूक प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## 50 लाखांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

५० लाख रुपयांच्या बदल्यात सत्तर लाख रुपये खात्यात आरटीजीएस द्वारे ट्रान्सफर करून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्या प्रकरणी आठ जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अश्रफ दिलावर खान हे तळोजा फेस वन येथे राहत असून उज्वल शहा आणि त्यांचे साथीदार इमरान, अक्षय, मनोज, रेहान, गोपाळ, डॅनी आणि एका अनोळखी इसमाने संगणमत करून त्यांच्या राहत्या घरी संपर्क साधला आणि 50 लाख रोख रकमेच्या बदल्यात 70 लाख रुपये खात्यात आरटीजीएस द्वारे ट्रान्सफर करून देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या घरातून पन्नास लाख रुपये घेण्यास भाग पडून त्यांना विद्याविहार, मुंबई येथे नेऊन 50 लाख रुपयांची बॅग तेथे असलेल्या अनोळखी इसमास देण्यास भाग पाडले आणि पूर्वनियोजित प्लॅन प्रमाणे पोलिस असल्याचे भासवले आणि पोलिसांसारखी फायबर काठी हातात असलेले काही लोक कारमधून उतरले आणि पैशाची बॅग घेतलेल्या अनोळखी इसमाला गाडीत घेऊन निघून गेले. त्यानंतर त्यांना मोटर कार मध्ये बसवून ते निघून गेले आणि पैसे घेण्याकरता गोरेगाव येथील ओबेराय मॉल मध्ये येण्यास सांगून त्या ठिकाणी त्यांनी वाट पाहिली मात्र कोणीच आले नाही आणि त्यांची दिशाभूल केली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## गाडीचे काच फोडून लॅपटॉप आणि अन्य साहित्याची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तीन वाहनांच्या काचा फोडून चोरांनी एक लाख 65 हजार रुपये किमतीचे लॅपटॉप, मॅजिक कीबोर्ड, चार्जर असा एकूण एक लाख 65 हजार रुपये किमतीच्या ऐवजाची चोरी केली. चोराविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. केदार कौलास हे खारघर येथे राहत असून 17 जून रोजी त्यांच्या कारची कॉच फोडून लॅपटॉप चोरून नेला तर अश्विन कुमार कापडणीस यांच्या कारची काच फोडून चोरांनी एप्पल पेन्सिल, मॅजिक कीबोर्ड, आयपॅड चोरून नेले. आणि रविकांत पांडे यांच्या कारची काच फोडून लॅपटॉप, आयफोन, चार्जर चोरून नेले.

## पहिल्या पतीचा मेसेज आल्याने दुसऱ्या पतीने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पत्नीला पहिल्या पतीचा व्हाट्सअप च्या माध्यमातून मेसेज आल्याने दुसऱ्या पतीने पत्नीला लाटण्याने मारहाण केली तसेच डोक्याचे केस धरून डोके भिंतीवर आपटले. या प्रकरणी 30 वर्षीय पती विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 27 वर्षीय महिला तळोजा येथे राहत असून त्यांचे पहिले घटस्फोट झाले आहे. त्यानंतर 2023 मध्ये त्यांचे दुसरे लग्न झाले आणि त्या तळोजा येथे राहण्यास आल्या. मे महिन्यात त्यांच्या पहिल्या पतीचा त्यांना मेसेज आला. याबाबत दुसऱ्या पतीने विचारणा केली असता नॉर्मल मेसेज असल्याचे सांगितले. यावेळी पतीने पत्नीला मारहाण करून शिवीगाळ केली. त्यानंतर पती त्यांना नेहमी त्रास आणि मारहाण करत होता. त्यानंतर जून महिन्यात त्यांचे दुसरे पती कामावरून घरी आले असता त्यांनी पत्नीला घराबाहेर काढले. घरात घेण्यासाठी विनंती केली असता त्यांना घरात घेतले आणि लाटण्याने मारहाण केली. तसेच केस धरून भिंतीवर डोके आपटले.

## राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांची जेष्ठ.वद्य नवमी.,१६७४ तिथीनुसार ३५१वी पुण्यतिथी भायखळा येथे साजरी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

राजमाता जिजाऊसाहेब भोसले यांची जेष्ठ.वद्य नवमी.,१६७४ तिथीनुसार ३५१वी पुण्यतिथी निमित्ताने भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले,छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास आमदार मनोज जामसुतकर,वीरमाता जिजाबाई स्मृती मंडळाचे अध्यक्ष भाऊ सावंत,वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणीसंग्रहालयाचे संचालक संजय त्रिपाठी, उद्यान अधिक्षक परदेशी,रमेश रावल यांनी पुष्पहार व गुलाब फुल अर्पण करून अभिवादन केले.शुक्रवार दि.२० जून २०२५ रोजी जिजामातेची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



# उरणातील नगराजशेठ सीबीएसई स्कूलमध्ये

## 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठयाउत्साहत संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

संयुक्त राष्ट्रसंघाने 21जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. जिल्हा प्रशासन , जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी, आणि योग संस्था यांच्या समन्वयाने 21 जून 2025 हा 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन,साजरा करण्यात येत आहे. "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" याअनुसार योग दिनाचे औचित्यसाधून उरण येथील नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्याउत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी योगाचे अनेक प्रकार सदर केले.तर अलीकडील धकाधकीच्या



जीवनात योगाला किती महत्व आहे योगाचे फायदे कोणते याबाबत सौ.शिल्पा.पडवळ मॅडमने सविस्तरपणे माहिती दिली.त्यानंतर विद्यार्थ्यांनी योगाच्या अनेक आसनाचे प्रकार सादर केले, याकामी विद्यालयाच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिक्षिका सौ.शिल्पा पडवळ मॅडम व सौ.नम्रता.नराळे मॅडम यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षित केले. विद्यार्थ्यांना उत्तमप्रकारे प्रशिक्षण देऊन योगाच्या अनेक प्रकारचे सादरीकरण केले. यावेळी विद्यालयाचे प्रमुख व्यवस्थापक तथा उरणमधील जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील,विद्यालयाच्या प्रिन्सिपॉलसौ. ज्योती म्हात्रे मॅडम,सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आपले मार्गदर्शनपर विचार मांडताना विद्यालयाचे प्रमुख व्यवस्थापक म्हणाले की "योगविद्याही भारतीय संस्कृतीला नवीन नसून अनेक युगां पासून ऋषीमुनि आपल्या योग सामर्थ्यावर वर्षानु वर्षे तपश्चर्येला बसल्याचे दाखले आपल्या संस्कृतीत आहेत परंतु आज धाकाधकीच्या जीवनात आपण सारे घडाळ्याच्या काट्यावर चालतो त्यानुळे जीवनात स्वाथ्य मिळत नाही.आज या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांनी जी विशेष प्रशिक्षिके सादर केली त्या सर्वांचेचे मी कौतुक करतो आणि त्यांना प्रशिक्षित केलेलेल्या शिक्षकांचे अभिनंदन करतो, योगविद्येचा प्रचार व प्रसार करणे सामाजिकदृष्ट्या महत्वाचे असल्याने विद्यार्थी जीवनातच योग शिक्षण मिळणे आवश्यक असल्याचे विद्यालयाचे प्रमुख व्यवस्थापक प्रदीप पाटील यांनी शेवटी समारोप करताना सांगितले.

## कोल्हापूर जिल्हा रहिवाशी संघ मुंबई महानगर"तर्फे छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

"कोल्हापूर जिल्हा रहिवाशी संघ मुंबई महानगर", तर्फे "लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती" निमित्त दिं. गुरुवार २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० ते ०८.०० वा. "आगरी कोळी संस्कृती भवन", प्लॉट १२, पाम बीच रोड, सेक्टर २४, नेरूळ, नवी मुंबई ४००७०६ येथे मा.श्री. यशवंत गोसावी सर, सुप्रसिद्ध व्याख्याते, अध्यक्ष शिवनिश्चल सेवाभावी ट्रस्ट,पुणे यांचे "छत्रपती शाहू महाराज यांचा जीवनप्रवास आणि आजची परिस्थिती" या विषया वरील व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल "कोल्हापूरकर रत्नांचा सत्कार सोहळा" मा.श्री. चंद्रकांत दादा पाटील उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य, मा.श्री. गणेश नाईक साहेब वनमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री. धैर्यशील दादा माने खासदार, हातकणंगले लोकसभा, मा.श्री. चंद्रकांत हंडोरे साहेब खासदार राज्यसभा, डॉ. अशोकराव माने (बापू) आमदार, हातकणंगले विधानसभा यांच्या हस्ते आणि प्रमुख उपस्थितीत होणार आहे. तरी तमाम मुंबई महानगरातील सर्व कोल्हापुर रहिवासी बंधू आणि भगिनी,जेष्ठ नागरिक,अबाल वृध्द यांनी हजर राहून सांस्कृतिक कार्यक्रमोत्तर भोजन व्यवस्थेचा आस्वाद घ्यावा असे संघाचे माननीय संस्थापक,अध्यक्ष,सेक्रेटरी,खजिनदार यांच्यासह सर्व संघटकानी सस्नेह आवाहन केले आहे.अशी महिती संघटक डॉ कृष्णा देसाई यांनी दिली आहे.




## दादासाहेब धनराज विसपुते सभागृह, विचुंबे, नवीन पनवेल येथे योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: प्रत्येक वर्षी २१ जून रोजी जगभरात "आंतरराष्ट्रीय योग दिन" मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल यांच्या वतीने २१ जून रोजी,दादासाहेब धनराजजी विसपुते सभागृह, विचुंबे , नवीन पनवेल येथे योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख योग मार्गदर्शक म्हणून गोपाळ पाटील उपस्थित होते. त्यांनी योगाचे शास्त्रीय महत्त्व, मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणारे फायदे तसेच नियमित योगाभ्यासाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमाचे आयोजन धनराज विसपुते यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. योग सत्रात विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानाचा सराव केला. योग मार्गदर्शकांनी उपस्थितांना योग्य पद्धतीने योग कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखवून समजावून सांगितले. संपूर्ण कार्यक्रम धनराज विसपुते, अध्यक्ष आणि संगीता विसपुते सचिव – आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिनाचा सोहळा मोठ्या यशस्वीरित्या संपन्न झाला.



## नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास कटिबद्ध - माजी सभागृहनेते परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

घोटगावाला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी तसेच परीरातील नागरीकांचे जीवनमान उंचावण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात नागरीकांचे सर्व प्रश्न मार्गी लावून त्यांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी भाजप काम करेल अशी ग्वाही पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी घोट येथे विविध विकास कामांच्या शुभारंभावेळी केले. दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी



वर्षनिमित्त विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्याअंतर्गत भाजपचे युवानेते नितेश पाटील यांच्यावतीने घोट गावातील नागरीकांना मोफत छत्री आणि परिसरातील सोसायट्यांना डस्टबिन वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. तसेच यावेळी घोट गावाजवळ सुमारे १२ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या पुलाचे उद्घाटन, १२ कोटी ६२ लाख रुपयांच्या निधीमधून साकारण्यात येणाऱ्या कोयनावेळे ते आरटीओ पर्यत्ताच्या रस्त्याच्या डांबीकरणाच्या कामाचे आणि सुमारे ९ कोटी ५ लाख रुपयांच्या निधीमधून बांधण्यात येणाऱ्या स्मशानभूमी भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. या कामांचे शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठनेते अरुणशेठ भगत आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले. या वेळी माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, संतोष भोईर, खारघर मंडल अध्यक्ष प्रविण पाटील, पनवेल उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, चिटणीस आशिष कडू, नवनाथ पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, निर्दोष केणी, भाजपा नेते नितेश पाटील, हालोजी निघुकर, बाळकृष्ण पाटील, मोहन पाटील, शिवराम निघुकर, हरिभाऊ पाटील, एकनाथ पाटील, मोहन निघुकर, रमेश पाटील, दिनेश केणी, रविकांत म्हात्रे, नंदुकुमार म्हात्रे, सुरेश पोरजी, मंदार कदम, विनेश कदम, सुनील कदम, जयराम कदम, विजय कदम, गणेश निकोडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## जवाहरलाल नेहरू पोर्ट अंतर्गत दिव्यांगांकरिता योग शिबिराचे आयोजन.

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**
**रणिता ठाकूर उरण रायगड**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यामधील जवाहरलाल नेहरू पोर्ट अंतर्गत उरण तालुक्यामधील दिव्यांग बांधवांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत योग सप्ताह अंतर्गत योगा शिबिर १९ जून २०२५ रोजी राबवण्यात आले. दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो.योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन. सदर योग दिन साजरा करण्यामागील जेएनपीटी पोर्ट च्या वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव मॅडम यांनी यावर्षी एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत हा दिन दिव्यांगांकरिता साजरा करण्याचे ठरवले. तन आणि मन जेव्हा योगाने सजते तेव्हा आयुष्य खरच आरोग्याने भरते. याच प्रमाणे दिव्यांग बांधवांकरीता योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक लाभ पोहोचवणे. निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे. दिव्यांगांनाही तणाव, चिंता आणि आजारांपासून बचाव करण्यासाठी योगाचे महत्त्व समजावणे. 'योग' ही भारताने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. आणि या देणगीचा उपयोग दिव्यांग बांधवांना व्हावा असा त्यांचा मानस होता.योग ही केवळ व्यायामाची पद्धत नाही, तर ती एक जीवनशैली आहे. योग दिन साजरा करून आपण केवळ आरोग्य सुधारत नाही, तर भारताची एक प्राचीन परंपरा जिवंत ठेवतो. या योगा शिबिरामध्ये उरण तालुक्यातील तब्बल १०० हुन अधिक दिव्यांग भर पावसात उपस्थित राहिले. याप्रसंगी दिव्यांगांकरिता अल्पोहार आणि १०० टी-शर्ट ही देण्यात



आल्या. या योग दिनाच्या कार्यक्रमांमध्ये प्रत्येक दिव्यांगाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कारण इथे या कार्यक्रमाला येणारा सामान्य नागरिक नसून दिव्यांग होता. आलेल्या योगा प्रशिक्षकाने चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करीत खेळीमेळीच्या वातावरणात सदर प्रशिक्षण दिले. याप्रसंगी शिवयोग चारीटेबल चे योगा प्रशिक्षक संतोष बहिरा, संगीता पाटील, बेला आगलावे तसेच उरण सामाजिक संघटनेचे आणि जेएनपिटी चे ट्रस्टी भूषण पाटील, दिव्यांग सामाजिक संघटनेचे सर्व शिलेदार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सांगता संघटनेचे सल्लागार मदन पाटील यांनी या योग शिबिराचा आलेल्या दिव्यांग बांधवांना नक्कीच फायदा होईल तसेच दिव्यांग बांधव भविष्यात त्याचा नक्कीच सराव करतील आणि त्यांचे शरीर सुदृढ बनवण्याचा प्रयत्न करतील असे दिव्यांगाप्रति आश्वासन दिले. आणि कार्यक्रच्या आयोजकांचे म्हणजे जवाहरलाल नेहरू पोर्ट आणि वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव मॅडम यांचे आभार व्यक्त केले.

## शिरपूर पोलीस स्टेशनच्या कर्मचारी संगीता मानकर यांना मिळाली पदोन्नती.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

शिरपूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेल्या संगीता मानकर ह्या पोलीस कर्मचारी यांना पदोन्नती मिळाली आहे. त्या आता सहाय्यक उपनिरीक्षक झाले आहेत शिरपूर पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या संगीता मानकर यांची सहाय्यक उपनिरीक्षक पदी पदोन्नती झाली आहे दरम्यान 20 जून रोजी शिरपूर पोलीस



स्टेशनचे ठाणेदार केशव वाघ यांनी संगीता मानकर यांना सन्मानित केले. तसेच यावेळी पोलीस उपनिरीक्षक इमरान खान पठाण. यांनी सुद्धा मानकर यांना सन्मानित केले. याप्रसंगी शिरपूर पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे कौतुक होत आहे. तसेच शिरपूर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509




दैनिक युवक आधार - सायकल चालवा, पर्यावरण वाचवा हा संदेश देत, तसेच शारीरिक आणि आध्यात्मिक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल शहरातून प्रथमच पनवेल रायडर्स यांच्यावतीने पनवेल ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विशेष सहकार्याने आयोजित या वारीला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते भगवा झेंडा फडकावून या सायकल वारीचा शुभारंभ झाला. यावेळी त्यांनी सर्व सहभागी सायकलस्वारांचे अभिनंदन केले. तसेच, आपल्या आरोग्याची काळजी घेऊन सुरक्षितपणे प्रवास करा, अशा शुभेच्छा दिल्या. २० ते २२ जून या तीन दिवसांत ही वारी पूर्ण होणार असून, या अनोख्या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोचणार आहे. यावेळी माजी नगरसेवक गणेश कडू यांच्यासह पनवेल रायडर्सचे सदस्य उपस्थित होते.

# दिग्रस येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पडला पार

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर**
**दिग्रस प्रतिनिधी** : इयत्ता १० वी, १२ वीच्या परीक्षेत गुणवंत ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पाठीवर कौतुकाची थाप देण्यात आली. ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी व त्यांच्या पालकांची कौतुक सोहळ्याला उपस्थिती होती. पालकमंत्री संजय राठोड यांनी विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्रही त्यांनी दिला.




यावेळी डॉ. बी. एन. स्वामी, पोलिस निरीक्षक वैजनाथ मुंडे, माजी जिल्हाप्रमुख पराग पिंगळे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशाली मासाळ, सुधीर देशमुख, राजकुमार वानखडे, उत्तम ठवकर, संदीप दुधे, मिलिंद मानकर, बाबूसिंग जाधव, अरुण राठोड, प्रेम राठोड, संजीव चोपडे, दिवाकर राठोड, यादव गावंडे, यादव पवार, जॉकी राठोड,श्रीकांत टाले, संजीवनी शेरे, वर्षा निगोटे, दुर्गा दुधे, माधुरी महल्ले, प्रवीणा अस्वार, शीतल उदगीर, संगीता वानखेडे आदींची उपस्थिती होती.

आज कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही. यश हे नशिबाने नव्हे, तर सातत्यपूर्ण प्रयत्नांनी मिळते.

यशाच्या मागे अपयश लपलेले असते. गुणवंत विद्यार्थीही काही इतर बाबींमध्ये अनेकदा अपयशी झाले असतील. पण त्यांनी हार मानली नाही, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. प्रत्येक अपयश एक शिकवण देत असते. त्याचा स्वीकार करायला शिकले पाहिजे. आज आपण जे आहोत, ते शिक्षक, आई-वडील आणि समाजाच्या योगदानामुळे आहोत, याची जाणीव ठेवली पाहिजे, असे आवाहन पालकमंत्री राठोड यांनी केले.आपल्या यशामध्ये अनेकांचे हात असतात. त्यामुळे मदत करणाऱ्यांना, प्रोत्साहन देणाऱ्यांना कधी विसरू नका. नेहमी 'मी'च्या जागी 'आपण'ही भावना ठेवा, असा सल्लाही विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीस लाखांची देणगी
### मंगेश चिवटे यांच्याकडून वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम

दैनिक युवक आधार
मुंबई,(केतन भोज);



मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे मुळ संकल्पक व उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीद्वारे गरजू रुग्णांना मदत व्हावी यासाठी वाढदिवसानिमित्त १ लाख रुपयांची देणगी धनादेशाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केली. राज्यातील गोरगरीब गरजु रुग्णांना मदत व्हावी यासाठी मंगेश चिवटे यांनी सर्वप्रथम मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडली होती व त्यांनीही त्यास तात्काळ मंजुरी दिली होती.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंगेश चिवटे यांनी वैद्यकीय कक्षाचे काम लोकाभिमुख करुन अडीच वर्षात एकावण्ण हजार रुग्णांना चारशे कोटी पेक्षा जास्त मदत वितरित केली.गेली आठ वर्षांपासुन सामाजिक बांधिलकी व रुगणसेवेस समर्पित भावनेतुन मंगेश चिवटे यांची मुलगी मुक्ताई व वडील जेष्ठ पत्रकार नरसिंह चिवटे व स्वःताच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीस मदत करीत आहेत.या भेटी दरम्यान मंगेश चिवटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दुर्मिळ SSPE आजार आणि अन्य अशा दुर्मिळ आजारांवर राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन या आजाराने ग्रस्त लहान मुलांच्या पालकांना सहानुभुतीपूर्वक विचार करून मदत करावी अशी मागणी केली.

## मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राचे क्षयरोग मुक्त भारत अभियानासाठी मोलाचे सहकार्य

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज);**
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत 'क्षयरोग मुक्त भारत अभियान' निक्षय शिबीरांचे आयोजन भारतभर करण्यात येत आहेत.या शिबिरात जोखमीच्या व्यक्ती म्हणजेच वृद्धाश्रम,अनाथाश्रम,व्यसनमुक्ती केंद्र,ज्येष्ठ व्यक्ती,मधुमेहि व्यक्ती,बीएमआय कमी असलेल्या व्यक्ती,टी बी रुग्णांचे सहवासित अशा सर्वांची या शिबिरात तपासणी करून क्षयरोग रुग्ण शोधून त्यांचेवर उपचार करणे.हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.याच अभियानाचा भाग म्हणून पालघर जिल्हा क्षयरोग केंद्र अधिकारी डॉ.शशिकांत साळुंके यांच्या मार्गदर्शनात वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरभी माजगावकर आणि त्यांचे सहकारी तंत्रज्ञ यांच्या अधिपत्याखाली मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्र,चांदीप,विरार (पूर्व) येथे दाखल असलेल्या व्यक्तींची क्षयरोग चाचणी (CY-TB TEST) व एक्स-रे काढण्यात आले.यासाठी वसई तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अंतरा सोनी आणि



त्यांचे क्षयरोग पथक (ग्रामीण) यांच्यासोबत प्राथमिक आरोग्य केंद्र,पारोळ येथील डॉ.संकेत हेगडे व त्यांच्या आरोग्य सेविका,आरोग्य सेवक,आशा सेविका या सर्वांचे विशेष सहकार्य मिळाले. याप्रसंगी मिरॅकल फाउंडेशन येथे दाखल असलेल्या व्यक्ती व या ठिकाणी कार्यरत असलेला संपूर्ण स्टाफ अशा एकूण १०४ व्यक्तींची क्षयरोग चाचणी (CY-TB) आणि एक्स-रे घेण्यात आले. यावेळी मिरॅकल फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राचे मानसोपचार तज्ञ डॉ मनोहर यादव हे देखील उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी वसई तालुका क्षयरोग पर्यवेक्षक श्री.योगेश पाटील,मिरॅकल फाउंडेशन युनिट क्रमांक २ चे केंद्र प्रमुख श्री.पंकज कौरा,स्टाफ श्री.झीशान,श्री.अनिकेत व समन्वयक श्री.रमेश सांगळे यांनी विशेष पुढाकार घेतला. 'क्षयरोग मुक्त भारत अभियान' या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी मिरॅकल फाउंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष श्री.सुभाष (बाबूजी) मनराय यांनी जिल्हा क्षयरोग केंद्र पालघर येथे पाठपुरावा केला.

## आष्टी तहसीलच्या दारात निराधारांच्या थकीत मानधनासाठी रिपाईचे उपोषण आठ दिवसात थकित मानधन देण्याचे मागणी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**:- मारुती सत्रे**



तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावण बाळ, रमाई घरकुल, तसेच पंतप्रधान घरकुल योजनेच्या लाभार्थींचे थकीत मानधन त्वरित देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थींच्या उपस्थितीत तहसील कार्यालयाच्या दारात मंगळवारी उपोषण करण्यात आले.

याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. की मागील सहा महिन्यापासून संजय गांधी निराधार, श्रावण बाळ योजना तसेच रमाई घरकुल, पंतप्रधान घरकुल या योजनेच्या अनेक लाभार्थींचे मानधन व घरकुलाचे हप्ते थकीत असल्यामुळे लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. त्या थकीत योजनेच्या लाभार्थींच्या मानधनासह घरकुलाचे हप्ते त्वरित देण्यात यावेत. या मागणीसाठी तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयाच्या दारात लाभार्थींसह उपोषण करण्यात आले. याप्रसंगी तहसील कार्यालय व पंचायत समिती विभागाच्या प्रतिनिधींनी उपोषणस्थळी भेट देऊन आठ दिवसात थकीत मानधन व घरकुलाचे हप्ते देण्यात येतील. असे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

## मानधन नको पगार हवा पनवेल नेरे विभागाच्या आशा वर्कर संपावर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
पनवेल तालुक्यातील नेरे ग्रामीण परिसरातील आशा वर्कर यांना गेल्या पाच महिन्यापासून पगार न मिळाल्याने राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ या संघटनेच्या माध्यमातून 18 जून पासून संपावर गेल्या असून आज दिनांक 21 जून रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे समोर सुमारे ५० आशा वर्कर यांनी घोषणा देत मानधन नको पगार पाहिजे तसेच आशा वर्कर यांना महिलांच्या कॅन्सर टेस्ट, सुरक्षेच्या दृष्टीने अपुऱ्या वस्तू देणे,ऑनलाइन फॉर्म भरणे कमी शिकलेल्या असल्याने ऑनलाइन करणे जमत नसल्याने विरोध करत आहेत त्यांच बरोबर विविध मागण्या ची मागणी केली आशा वर्कर या बाल मृत्यू प्रमाण कमी करण्यासाठी मातांना सुरक्षा देण्यासाठी मातांच्या संगोपनावर ध्यान देण्यासाठी नेमणूक केले असून बाळंतपण दरम्यान आशा वर्कर घरोघरी जाऊन काम करत असून आशा वर्कर मुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी झाली असून त्यांची ते चूक काम बजावत असून सुद्धा त्यांच्यावरती अतिरिक्त कामाचा बोजा चढवल्याने आशा वर्कर यांनी संपाची घोषणा केली असून त्यांना गेली पाच महिन्यापासून मानधन ही वेळेवर मिळत नसून त्यांना मानधन नको असून पगार हवा असल्याची मागणी आशा वर्कर करत आहेत




## नांदेड शहरामध्ये जागतिक योग दिना निमित्य पतंजली योग पीठ यांचा संयुक्त विद्यमानाने योग शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड** - जागतिक योग दिना निमित्य नांदेड येथे भाजपा महानगर अध्यक्ष मा.आ.अमरनाथ राजूरकर व लोकमत ,नमस्ते नांदेड ,शारदा कंस्ट्रक्शन व पतंजली योग पीठ यांचा संयुक्त विद्यमानाने योग शिबिर अजोयित करण्यात आले आहे, सर्व




वयोगटातील महिला पुरुष यांचा उत्तम असा सहभाग दिसला व शाळेतील सर्व विद्यार्थी यांनी हसत खेळत योग शिबिराचा आनंद लुटला. कार्यक्रमाला या वेळी उपस्थित राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर ,आमदार.श्रीजयाताई चव्हाण, श्री शहाजी उमाप आय.पी. एस विशेष पोलिस महानिरिक्षक कार्यालय, नांदेड,जिल्हाधिकारी राहुल कॅर्डीले, पोलिस अधिक्षक अबिनाशजी कुमार, जिल्हापरिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मेघना काव्ली,महापालिका आयुक्त महेश डोईफोडे, यांची प्रमुख उपस्थितीत योग साधनेने आपले तन आणि मन संतुलित राहते.निरोगी आणि शांततामय जीवनासाठी योगाला आपल्या दिनचर्येचा भाग बनवण्याचा संकल्प करूया.

## लिहाखेडी जिल्हा परिषद शाळेत योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड** : - तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लिहाखेडी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

पतंजली योगपीठ सिल्लोडचे प्रमुख प्राध्यापक शिवराम साखळे यांनी याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.योगामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढून आजारापासून व्यक्तीचे संरक्षण होते. शारीरिक मानसिक व भावनिक संतुलन राखून आनंददायी जीवनशैलीसाठी योग नित्य जीवनाचा अविभाज्य भाग



बनला पाहिजे असे या प्रसंगी बोलताना ते म्हणाले.मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून प्राणायाम आणि विविध आसनांची प्रात्यक्षिके करून घेतली..याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश बावस्कर,बाळाभाऊ बावस्कर,ग्रामरोजगार समिती संघटक महाराष्ट्र राज्य विनोद चव्हाण,देविदास सपकाळ,चंद्रभान साखळे,ग्रामपंचायत अधिकारी राठोड साहेब आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती..

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक सुधाकर बावस्कर,सज्जन टाकसाळे,सिद्धेश्वर भुतेकर,संजय मोरे,रुपेश भाले,विद्या बनसोडे,उषा लुटे,लिलाबाई रामेकर,मुख्यमंत्री युवा कौशल प्रशिक्षणार्थी मंदा इंगळे यांनी परिश्रम घेतले..

# सिडकोने स्वत :च्या खर्चाने सुसज्ज हॉस्पिटल उभारावे.
## अद्ययावत भूमिपुत्र भवन उभारवे : गोपाळ पाटील

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**
सिडकोने 55 वर्षापूर्वी ठाणे-पनवेल-उरण मिळून येथील 95 गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल दराने घेतल्या.त्याजमिनीवर लाखो रुपये परस्पर कमावले. घरे, उद्योग,व्यवसाय-राष्ट्रीय प्रकल्प शहरे आणि शहरात टॉवर संस्कृतीचा डोलारा उभा केला, परंतु ज्यांच्या पिकत्या शेत जमिनीवर हा विकासाचा तशा वाजविला जातोय, त्या उरणकरांना आजही सिडको प्रशासनाने अनेक नागरीसोई सुविधानपासून वंचित ठेवले आहे. साधं हॉस्पिटल नाही की भूमीपुत्र भवन नाही, ही बाब केवळ लाजीरवाणीच नाही, तर लांच्छनास्पद आहे! सिडकोने उरणकरना माती खाऊ घातली आणि डोंगर पोखरून करोडो ब्रास मातीही पळविली आहे. असे रोख ठोक प्रतिपादन उरण उत्कर्ष समिती चे अध्यक्ष गोपाळ पाटीलयांनी केले आहे या संदर्भात आमच्या प्रतिनिधीनी उरण उक्तर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांची भेट घेतली असताते म्हणाले मी नुकतेच सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना सडेतोड निवेदन दिले असल्याचे सांगत त्यांनी या निवेदनात उरणची जनता या प्रश्नावर जन आंदोलन उभे करतील," असा घणाघाती इशाराही उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालकांना दिला असल्याचे ते म्हणाले.व आणि हॉस्पिटल व भूमिपुत्र भवन सिडकोने स्वतःच्या खर्चाने उभारावे अशी मागणी केल्याचे त्यांनी सांगितले. 2010 साली तत्कालीन आरोग्यमंत्री दीपक सावंत यांच्या उपस्थितीत उरणमध्ये सुसज्ज रुग्णालयासाठी भूमिपूजन पार पडले होते. नंतर 2024 ऑगस्ट मध्ये पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच हॉस्पिटलचं भूमिपूजन केलं! एवढं सगळं करूनही 18 वर्षांनंतर त्या जागेवर एक वीटही रचलेली नाही! उलटपक्षी शासनाने 95 लाख रुपये सिडकोला मोजून या भूखंडावर रानटी गवातझुडपे याचेच साम्राज्य पसरलेले आहे, हा प्रकार म्हणजे जनतेच्या डोळ्यात अक्षरशः धूळफेक करण्यासारखा आहे. जमिनी गेल्या, विकास गेला भूमिपुत्र मात्र फाट्यावर !मारून सिडकोने उरण परिसरात हजारो एकर जमीन संपादित केली. 'विकासाच्या नावाखाली ती जमीन कोट्यवधी रुपयांना विकली. तिथे केंद्र आणि राज्यसरकारचे प्रकल्प आले. मग स्थानिक भूमिपुत्रांच्या



वाट्याला काय? ना आरोग्य सुविधा, ना सामाजिक केंद्र, ना शिक्षण संस्था... फक्त आश्वासनांची खैरात आणि भूमिपूजना पुरताच फक्त हॉस्पिटलचा भूखंड! पुढे प्रतिनिधीशी बोलताना गोपाळ पाटील म्हणाले ज्यावेळी सिडकोने जमीन संपादीत केली त्यावेळी प्रकल्पग्रस्थांवर आश्वासनाची खैरात केली होती, प्रकल्पग्रस्थांच्या नागरीसोई-सुविधांसाठी पुनर्वसन हा स्वतंत्र विभाग सुरु केला होता.पण तो नावा पुरताच ठरला,उरण-द्रोणागीरीचा विकास होत गेला खरा परंतु सिडकोच्या नियोजनशून्य कारभारामुळे हा विकास अनेकांचे बळी घेणारा ठरला.यासठी जवळ जवळ 20ते 25 वर्षापासून मी स्वतः सुनीलजी तटकरे हे आमदार,नंतर मंत्री झाल्यावर त्यांच्या कडे पाठपुरावा करून 100 खाटांच्या रुग्णालया साठी साकडे घातले होते आणि प्रस्ताव पारित करून घेतला होता,त्यानंतर अनेक सामाजिक संस्था या रिंगणात उतरल्या आहेत ही गोष्ट समाधान कारक आहे.मी अनेक आंदोलने छेडली आहेत आणि ती यशस्वी केली आहेत.मग रूग्णालया बाबत व भूमिपुत्र भवना संदर्भात आपले मत काय आहे याबाबत आमच्या प्रतिनिधीने विचारणा केली असता त्यांनी सांगितले उरणात जी वाहतूक कोंडी होते यासाठी उरण कोटना क्यावरून बायपास रस्ता करण्याची मागणी मी केली होती आज हा रस्ता पूर्णतेच्या मार्गावर आहे,मी रेल्वेचे करळ फाटक उघडण्यासाठी आंदोलन केले प्रसंगी उपोषण केले त्याचा प्रत्यय म्हणजे करळ गावासमोरील झालेला उड्डाणपूल तुम्हाला पाहवयास मिळतो.खोपटा पुलाला श्रमदानातून सुरुवातीला केलेली पाय वाट आजही सर्वांच्या स्मरणात आहे तात्पर्य इतकेच “मी बोलतो तेच पूर्णकरतो” त्यामुळे आज मी पून्हा एकदा गेली 18 वर्षा पासून प्रतीक्षेत असलेअल्या उरण मतदारसंघ स्वतंत्र झाल्या पासून रुग्णालयाच्या फाईलवरील साठलेली धूळआजपर्यंत झालेल्या तीनही आमदाररात झटकण्याची ताकद नाही, परंतु राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने 95 लाख रुपयेमोजून सिडको कडुन जो 100 खाटांच्या रूग्णालया साठी खरेदी करण्यात आलेला भूखंडावर मात्र 2010 साली तत्कालीन आरोग्यमंत्री दीपक सावंत यांच्या उपस्थितीत उरणमध्ये सुसज्ज रुग्णालयासाठी भूमिपूजन पार पडले होते, आणि नंतर 2024 ऑगस्ट मध्ये पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच हॉस्पिटलचं पून्हा भूमिपूजन केलं !अशा प्रकारे एकाच.रुरुग्णालयाच्या एकाच भूखंडाचा दोनवेळा भूमीपूजन सोहळा करण्यात आला. असल्याचे ते म्हणाले उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनीया संदर्भात सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना सडेतोड निवेदन पाठवून हा सर्व प्रकार थेट उघडकीस आणला आहे. त्यांच्या मते, "माणसं हॉस्पिटल अभावी मरत असताना, सिडको आणि महाराष्ट्रशासन फक्त भूमिपूजनाचे नाटक करत आहे. उरणच्या भूमिपुत्रांना मूर्ख समजण्याची ही शेवटची वेळ!" आहे,हे श्री.पाटील यांच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे आहेत. त्यामध्ये उरणमध्ये तातडीने एक सुसज्ज हॉस्पिटल उभारावे. सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अद्ययावत भूमिपुत्र भवन उभारले जावे. दोन्ही प्रकल्पांसाठी सिडकोने जागाद्यावी, तात्काळ निधी व मंजुरी द्यावीव स्वतःच्या खर्चाने या दोन्हीही वस्तूतयार कराव्यात अशी जोरदार मागणी उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील यांनी या निवेदनाद्वारे केली आहे. "जर सिडकोने ही मागणी ऐकून घेतली नाही, तर आंदोलन उभे राहील ," असा घणाघाती इशाराही उरण उत्कर्ष समितीने या निवेदनांतून सिडको प्रशासनाला दिला आहे. राज्यकर्ते निवडणुकीच्या वेळेस उरणमध्ये हेलिकॉप्टरने येतात. भूमिपूजन करतात. भाषणात 'विकास'चा पाऊस पाडतात. आणि नंतर गायब होतात! आता भूमिपुत्रांचा संयम संपला आहे. ते प्रश्न विचारणार, उत्तरं मागणार, आणि जर गरज पडलीच तर रस्त्यावर उतरून आपल्या हक्कासाठी लढण्यासाठी सज्ज असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटल्याचे प्रतिनिधीला सांगितले